श्रीज्ञानेश्वरी
अध्याय चौदावा

या अध्यायाला गुणत्रयविभागयोग असे नांव आहे. स्थावर सृष्टी त्रिगुणात्मक प्रकृतीचा पसारा असल्यामुळे प्रकृतीच्या गुणभेदाचे हे विवेचन क्षराक्षरविचाराचाहि भाग होऊ शकते. म्हणून क्षेत्र-क्षेत्रज्ञविचार हे संकुचित नांव सोडून सातव्या अध्यायात जे ज्ञानविज्ञान सांगण्यास सुरवात केली आहे तेच ज्ञानविज्ञान जास्त खुलासेवार त्रिगुणात्मक भेद स्पष्ट करून या अध्यायात सांगीतले आहेत म्हणून याला वरील नांव आहे.

यात 27 श्लोक असून 415 ओव्या आहेत. यातील 240 वी ओवी दृष्टांताचे एक चांगले उदाहारण आहे. त्याच प्रमाणे 120 व्या ओवीत फार गमतीदार दृष्टांत दिला आहे.

ज्ञानेश्वरी
अध्याय चौदावा

जय जय आचार्या। समस्तसुरवर्या ।
प्रज्ञाप्रभासूर्या । सुखोदया ।। +1।।
जय जय सर्व विसांवया । सोऽहंभावसुहावया [1] ।
नाना लोक हेलावया । समुद्रा तूं ।।+2।।
आइकें गा आर्तबंधु ! ।निरंतरकारुण्यसिंधु ।
विशदविद्यावधू-। वल्लभा जी ! ।। +3।।
तूं जयांप्रती लपसी , । तया , विश्व हें दाविसी ।
प्रकट , तै करिसी ।। आघवेंचि , तूं ।।+4।।
कीं , पुढिलाची दृष्टी चोरिजें , । हा दृष्टिबंधु निफजे ।
परी नवल लाघव तूंझे । जे आपणपें चोरें ।।+5।।
जी ! तूंचि तूं , सर्वां यया । मा , कोणा बोधु , कोणा माया ! ।
ऐसिया आपेंआप लाघविया । नमो तुंज ।।+6।।
जाणो , जगीं आप वोलें , । तें तुझिया बोला सुरस जालें ।
तूंझेनि क्षमत्व [2] आले । पृथ्वीयेसी ।। +7।।
रविचंद्रादि शुक्ती , । उदय करिती त्रिजगती , ।
तें तुझिया दीप्ती । तेंज, तेंजा ।। +8।।
जें चळवळिजें अनिळे । तें दैविकेनि जी निजबळें ।
नभ तुजमाजी खेळें । लपीथपी [3]।। +9।।
किंबहुना , माया असोस । ज्ञान जी तुझेनि डोळस ।
असो ; वानणे सायास । श्रुतीसि हे ।। +10।।
वेद वानूनि तंवचि चांग । जंव न दिसे तुझें आंग ।
मग आम्हां तया मूग । एके पांती ।।+11।।
जी ! एकार्णवाचे ठाईं । पाहता थेंबाचा पाडु नाही ।
मा , महानदी काई । जाणिजती ? ।।+12।।
कां , उदयलिया भास्वतु , । चंद्र जैसा खद्योतु , ।
आम्हां श्रुति , तुज आंतु । तो पाडु असे ।।+13।।
आणि दुजया थांवो मोडे , । जेंथ परेशीं वैखरी बुडे , ।
तो तूं , मा , कोणें तोंडे । वानावासी ? ।।+14।।
यालागी आतां । स्तुती सांडूनि निवांता ।
चरणी ठेविजें माथा । हेंचि भलें ।।+15।।
तरी तूं जैसा आहासि , तैसिया । नमो , जी श्रीगुरुराया ! ।
मज ग्रंथोद्यमु फळावया , । वेव्हारा [4] होई ।।16।।

1 सेवन करणे

2 सहनशीलपणा

3 लपंडाव

4 सावकार

आतां , कृपाभांडवल सोडी , । भरीं मति , माझी पोतडी [1] ।
करीं , ज्ञानपद्द [2] जोडी । थोरा [3], मातें ।। 17।।
मग , मी, संसरेन [4] ,तेणें ।करीन संतांसी कर्णभूषणे ।
लेववीन सुलक्षणे । विवेकाची ।। 18।।
जी ! गीतार्थनिधान [5]। काढूं , माझे मन ।
सुयीं [6] स्नेहांजन ।आपलें तूं ।।19।।
हें वाक्सृष्टि ,एके वेळे [7]। देखतु , माझे बुद्धीचे डोळे , ।
तैसा , उदैजो जी निर्मळे ! । कारुण्यबिंबे ! ।।20।।
माझी प्रज्ञावेली वेल्हाळ [8] । काव्यें होय सफळ ।
तो , वसंतु होई , स्नेहाळ-।शिरोमणी ! ।।21।।
प्रमेय महापूरे । हें मतिगंगा ये थोरे [9] ।
तैसा वरिष [10] , उदारे ! । दिठवेनी ।।22।।
अगा विश्वैकधामा ! । तुझा प्रसाद चंद्रमा ।
करुं मज , पूर्णीमा । स्फूर्तीची , जी ! ।।23।।
जी ! अवलोकिलिया मातें , । उन्मेषसागरी भरितें ।
वोसंडेल , स्फूर्तीतें । रसवृत्तीचे ।। 24।।
तंव संतोषोनि श्रीगुरुराजें । म्हणितलें विनतिव्याजें [11] ।
मांडिले , देखोनि , दुजें । स्तवनमिषे ।। 25।।
" हें असो; आतां वांजटा [12],। तो ज्ञानार्थ [13] करूनि गोमटा [14] ।
ग्रंथु दावी ; उत्कंठा । भंगो नेदीं " ।।26।।
" हो कां जी ! स्वामी ! । हेचि पाहत होतो मी ।
जें , श्रीमुखें म्हणा तुम्ही । " ग्रंथु सांग " ।।27।।
सहजें [14] दुर्वेचा डिरु [15] । आंगेचि तंव अमरु ; ।
वरी आला पूरु । पीयूषाचा [16] ।।28।।
तरी , आतां येणे प्रसादें , । विन्यासे , विदग्धे [17] ।
मूळशास्त्रपदें । वाखाणीन ।। 29।।
परी जीवा आंतुलीकडे , । जैसी , संदेहाची डोणी बुडे , ।
ना , श्रवणी तरी , चाडे । वाढी दिसे , ।। 30।।
तैसी , बोली साचारी [18]। अवतरो माझी , माधुरी [19] , ।
माले [20] मागूनि घरी । गुरुकृपेच्या ।।+ 31।।
तरी मागां त्रयोदशी । अध्यायीं , गोठी ऐसी ।
श्रीकृष्ण अर्जुनेसी । चावळले [21] ।।32।।
जें क्षेत्रक्षेत्रज्ञयोगे । होईजें , येणे जगे , ।
आत्मा गुणसंगें , । संसारिया [22] ।।33।।

1 खोळ
2 ज्ञानप्रधान काव्याची
3 मोठा नफा 4 सरसावेन
5 गीतारूप गुप्त धन
6घाल
7 संपूर्णपणे
8 विस्तार पावावी
9 भरती येतें
10 वर्षाव कर
11 प्रार्थनेचे निमित्त करून
12 व्यर्थ बोलणे 13 ज्ञानरुपी विषय 13 चांगला
14 स्वभावतःच
15 अंकुर 16 अमृताचा
17 विस्ताराने आणि चतुरपणे
18 खरी 19 गोडी
20 खंडोबाचा नांगर घालून मागीतलेली भिक्षा
21 बोलले
22 संसारी

आणि हाचि प्रकृतिगतु । सुखदुःख भोगी हेंतु [1] ।
अथवा गुणातीतु । केवळु हा ।।34।।
तरी कैसा पां असंगा संगु ? । कोण तो क्षेत्रक्षेत्रज्ञायोगु ? ।
सुखदुःखादि भोगु । केवीं तया ? ।।35।।
गुण तें कैसे ? किती ? । बांधती कवणे रीती ? ।
नातरी , गुणातीती । चिन्हें काई ? ।।36।।
एवं , इया आघवेया । अर्था रूप करावया , ।
विषो एथ चौदाविया । अध्यायासि ।।37।।
तरि तो आतां ऐसा । प्रस्तुत परियेसा ।
अभिप्रायो विश्वेशा । वैकुंठाचा ।। 38।।
तो म्हणे , '' गा अर्जुना ! । अवधानाची सर्व सेना ।
मेळऊनि , इया ज्ञाना । झोंबावें हो ।।39।।
आम्ही , मागां , तुज बहुती । दाविले हें उपपत्ती , ।
तरी , आझुनी ,। प्रतीती-।कुशी [2] , न निघे ! '' ।।40।।

1 कारण

2 पूर्णपणे अनुभवाला येत नाही

श्रीभगवानुवाच

परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ।
यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ।।1।।

श्रीभगवान म्हणाले- आणखी पुनः ज्ञानांतले उत्तम ज्ञान सांगतो, जें जाणितल्याने सर्व मुनींना या लोकांतून परम सिद्धि प्राप्त झाली आहे .

म्हणौनि , गा ! पुढती । सांगिजैल तुजप्रती ।
'' पर '' म्हण म्हणौनि श्रुती । डाहारिलें [3] जें ।।41।।
एऱ्हवी , ज्ञान हें आपुले , । परी , पर [4] ऐसेनि जालें , ।
जें , आवडोनि घेतले [5] । भवस्वर्गादिक ।। 42।।
अगा ! याचि कारणे , । '' हें उत्तम सर्वापरी '' मी म्हणे ।
जें , वन्हि , हें , तृणे , । येरें ज्ञाने ।।+43।।
जिये भवस्वर्गातें जाणती , । यागचि चांग म्हणती , ।
पारखी फुडी [6] आथी , । भेदी जया ।।44।।
तियें , आघवीचि ज्ञाने , । केली येणें स्वप्ने , ।
जैशा , वातोर्मी गगने । गिळिजती अंती ।।45।।
कां , उदितें रश्मिराजें , । लोपिली चंद्रादि तेंजें ।
नाना , प्रळयांबुमाजें । नदी , नद ।। 46।।
तैसे येणें पाहलेया [7] , । ज्ञानजात जाय लया ।
म्हणौनियां , धनंजया ! । उत्तम हें ।।47।।

3 प्रसिध्द आहे

4 परके

5 आसक्ती निर्माण झाली

6 पारख करण्यात निष्णात

7 उदय झाल्याने

अनादि जें मुक्तता । आपुली , असे पंडुसुता ! ।
तो मोक्षु हातां येता , । होय जेंणे ।।48।।
जयाचिया प्रतीती[1] , । विचारवीरी समस्ती , ।
नेदिजेचि संसृती [2] । माथां उधऊं [3] ।।49।।
मनें , मन घालूनि मागें , । विश्रांति जालिया आंगे , ।
तें देही [4] , देहाजोगे । होतीचि ना ।। 50।।
मग तें देहाचें बेळें [5]। वोलांडूनि , एकेचि वेळे , ।
संवतुकीं कांटाळे [6] । माझे जाले ।।51।।

1 अनुभव आला असता
2 संसार 3 डोके वर काढू देत नाही
4 मनुष्य
5 अडसर
6 एकाच तोलामोलाचे

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ।
सर्गेऽपि नोपजायन्तें प्रलये न व्यथन्ति च ।। 2।।

या ज्ञानाचा आश्रय करून माझ्याशी एकरूपता पावलेले , सृष्टीच्या उत्पत्तिकालीहि जन्मत नाहीत आणि प्रलयकालीहि व्यथा पावत नाहीत म्हणजें जन्ममरणापासून अजिबात मुक्त होतात

जें , माझिया नित्यता। तेंणे , नित्य तें पंडुसता ! ।
परिपूर्ण , पूर्णता । माझियाची ।।52।।
मी जैसा अनंतानंदु , ।जैसाचि सत्यसिंधु ।
तैसेचि ते भेदु । उरेचि ना ।।53।।
जे मी जेवढे जैसे । तेचि तें जाले , तैसे ।
घटभंगी , घटाकाशे । आकाश जेवी ।।54।।
नातरी , दीपमूळकीं [7] । दीपशिखा [8] अनेकीं ।
मीनलिया , अवलोकीं , । होय जैसे ।।55।।
अर्जुना ! तयापरी , । सरली द्वैताची वारी [9] ।
नांदे , नामार्थ [10] , एकाहारी । मीतूंविण ।।56।।
येणेचि , पै , कारणे , ।जै पहिले सृष्टीचे जुंपणे [11] ।
तेही तया होणें , । पडेचिना ।। 57।।
सृष्टीचिये सर्वादी , । जया देहाची नाही बांधी [12] , ।
तें , कैचे प्रळयावधी । निमतील [13] पां ? ।।58।।
म्हणौनि , जन्मक्षयां-। अतीत तें धनंजया ! ।
''मी जालें '', ज्ञाना इया । अनुसरोनी ।।59।।
ऐसी , ज्ञानाची वाढी , । वानिली देवे आवडी ।
तेवींचि , पार्थाही गोडी । लावावया ।।60।।
तंव , तया जालें आन । सर्वांगी निघाले कान ।
सपाई [14] अवधान । आतला [15] पां ।।61।।

7 मुळच्या दीव्यात
8 दीव्याच्या ज्योती
9 येझारा
10 नामरुपात्मक पदार्थ
11 उत्पत्ती
12 बंधन
13 मरतील
14 संपूर्ण 15 अवधानरुप झाला

आतां , देवाचिया ऐसे । ,जाकळीजत[1] असे ,वोरसे [2] ।
जें , निरूपण आकाशे [3] । वेटाळेना ।।62।।
मग म्हणे,'' गा प्रज्ञाकांता [4] ! । उजवली [5] आजि वक्तृत्वता।
जें , बोलायेवढा श्रोता । जोडलासी ।। 63।।
तरी एकु मी , अनेकीं , । गोविजें देहपाशकीं , ।
त्रिगुणी लुब्धकीं [6] , । कवणेपरी ? ।।64।।
कैसा क्षेत्रयोगे । विये इये जगे ।
ते परिस सांगे । कवणेपरी ।।65।।
पै , क्षेत्र येणे व्याजें [7] । यालागी हें बोलिजें ।
जें मत्संगबीजें । भूती पिके ।।66।।

1 व्यापून गेला 2 प्रेमाने
3 गगनतत्वापलीकडले निरुपण
4 बुद्धिमंता 5 सफळ झाली
6 पारधी
7 निमित्ताने

मम योनिर्महद् ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ।। 3।।

हें भारता ! महद्ब्रह्म म्हणजें प्रकृति ही माझीच योनि असून मी त्या ठिकाणी गर्भ ठेवितो; नंतर त्यापासून सर्व भूतें उत्पन्न होऊं लागतात

एऱ्हवी तरी महद्ब्रह्म । यालागी हें ऐसे नाम ।
जें महदादिविश्राम [8] । शालिका [9] हें ।।67।।
विकारां बहुवस [10] थोरी ,। अर्जुना ! हेचि करी , ।
म्हणौनि , अवधारी । महद्ब्रह्म ।।68।।
अव्यक्तवादमती , । ' अव्यक्त ' ऐसी वदंती , ।
सांख्याचिया प्रतीती , । ' प्रकृति ' हेचि ।।69।।
वेदांती इयेतें ' माया ' । ऐसे म्हणिजें प्राज्ञराया ! ।
असो ; किती बोलो वायां , । अज्ञान हें ।।70।।
आपला आपणपेंयां । विसरु जो धनंजया ! ।
तेचि रूप यया , । अज्ञानासी ।।71।।
आणिकही एक असें , । जें विचारावेळे न दिसें , ।
वाती [11] पाहतां जैसे । अंधारे कां ! ।।72।।
हालविलिया जाय , । निश्चळी तरी होय , ।
दुधी जैसी साय । दुधाची ते ।।73।।
पै , जागरु , ना स्वप्न , । ना स्वरूप अवस्थान [12] ।
तें सुषुप्ति [13] कां घन [14] । जैसी होय ।।74।।
कां , न वियतां वायूतें , । वांझे आकाश रितें , ।
तया ऐसे निरूतें [15] । अज्ञान गा ।।75।।
पैल ,खांबु कां पुरुखु , ।ऐसा निश्चयो नाही एकु , ।
परी काय नेणो , आलोकु [16]। दिसत असे ।।+76।।

8 महत्तत्वादिकांचे 9 विश्रांति स्थान 10 वाढ
11 दिव्याने
12 समाधी
13 निद्रा 14 गाढ
15 खरोखर
16 भास

तेवीं , वस्तु जैसी असें , । तैसी , कीर न दिसें , ।
परी काही अनारिसे , । देखिजेंना ।।77।।
ना राती , ना तेंज , । तें संधि , जेवीं सांज , ।
तेवी विरुद्ध ना निज [1], । ज्ञान आथी ।।78।।
ऐसी कोण्ही एकीं दशा , । तिये वादु , अज्ञान ,ऐसा, ।
तया गुंडलिया [2] प्रकाशा , । क्षेत्रज्ञु नाम ।। 79।।
अज्ञान थोरिये आणिजे [3] । आपणपें , तरी नेणिजे ।
तें रूप जाणिजें । क्षेत्रज्ञाचे ।।80।।
हाचि उभय योगु । बुझे [4] बापा चांगु ।
सत्तेचा नैसर्गु । स्वभावो हा ।।81।।
आतां अज्ञानासरिखे । वस्तु आपणपांचि देखे ।
परी रूपे अनेके । नेणो , कोणे ? ।।82।।
जैसा रंकु भ्रमला , । म्हणे , '' जारे मी रावो आला '' ।
कां , मूर्च्छितु गेला । स्वर्गलोका ।।83।।
तेवी , लचकलिया [5] दिठी । मग देखणे जें जें उठी , ।
तया नाम सृष्टी , । मीचि विये , पै गा ! ।।84।।
जैसे कां स्वप्नमोहा [6] । तो एकाकीं देखे बहुवा ।
तोचि पाडु , आत्मया , । स्मरणेवीण असे ।।85।।
हेचि आनी [7] , भ्रांती । प्रमेय [8] , उपलवूं पुढती ।
परी तूं प्रतीती । याचि घे पां ! ।।86।।
तरी माझी हें गृहिणी । अनादि , तरुणी , ।
अनिर्वाच्यगुणी , । अविद्या हे ।।87।।
इये ,नाही , हेचि रुप , । ठाणे [10] , हे अति उमप [11], ।
हें निद्रिता समीप , । चेतां दुरी ।।88।।
पै , माझेनिचि आंगे । पहुडल्या , हें जागे ।
आणि सत्तासंभोगे , । गुर्विणी [12] होय ।।89।।
महद्ब्रह्मउदरी [13]। प्राकृती आठै विकारी ।
गर्भाची करी । पेलोवेली [14] ।।90।।
उभयसंगु पहिले । बुद्धितत्त्व प्रसवले ।
बुद्धितत्त्वे भारैले [15] , । होय मन ।।91।।
तरुणी , ममता मनाची , । तें अहंकार तत्त्व रची ।
तेंणे , महाभूतांची । अभिव्यक्ति [16] होय ।।92।।
आणि विषयेंद्रियां , गौसी [17] । स्वभावे , तंव भूतांसी ।
म्हणौनि , येती सरिसी [18]। तियेही रुपा ।।93।।

1स्वरूप नाही आणि जागहि नाही
2 आच्छादिलेल्या
3 वाढविते
4 जाण
5 दृष्टी स्वरुपावरून चळली
6 स्वप्नभ्रांतीने
7 वेगळ्या प्रकारे 9 भ्रमाचा सिद्धांत
10 आकार 11 फार व्यापक
12 गरोदर
13 मूळ मायेच्या पोटी
14 वाढ
15 ओतोप्रोत भरलेले
16 उत्पत्ती
17 अंतर्भाव करतें
18 बरोबरच

जालेनि विकारक्षोभे , । पाठी त्रिगुणाचे उभे [1] , ।
तेव्हां ये वासनागर्भे । ठायेठावो [2] ।।94।।
रुखाचा आवांका [3] । जैसी बीजकणिका ।
जीवी बांधे , उदका। भेटतखेवो ।।95।।
तैसी , माझेनि संगे , । अविद्या नाना जगे ।
आर [4] घेवो लागे । आणियाची [5] ।।96।।
मग गर्भगोळा तया , । कैसे रूप तै ये आया [6] ।
तें परियेसे , राया । सुजनांचिया ! ।।97।।
पै , मणिज [7] , स्वेदज [8] ,। उद्भिज [9] , जारज [10] ।
उमटती सहज । अवयव हे ।।98।।
व्योमवायुवशे , । वाढलेनि गर्भरसे , ।
मणिजु उससे [11] । अवयव तो ।।99।।
पोटी सूनि तमरजें । आगळिका [12] , तोय तेंजें ।
उठितां , निपजे । स्वेदजु गा ! ।।100।।
आपपृथ्वी उत्कटे [13] , । आणि तमोमात्रे निकृष्टे [14] ।
स्थावरु उमटे । उद्भिजु हा ।।101।।
पांचा पांचही विरजी [15] । होती मनबुद्ध्यादि साजी [16] ।
ही हेंतु जारजी , । ऐसे जाण ।।102।।
ऐसे चारी हें सरळ । करचरणतळ ।
महाप्रकृति स्थूळ । तेचि शिर ।।103।।
प्रवृत्ति , पेलले पोट [17] । निवृत्ति , ते पाठी नीट ।
सुर योनी आंगे आठ[18] , । ऊर्ध्वाची[19] ।।104।।
कंठु , उल्हासता [20] स्वर्गु , । मृत्युलोकु मध्यभागु ।
अधोदेशे चांगु । नितंबु तो ।।105।।
ऐसे लेकरु एक । प्रसवली हें देख ।
जयाचे तिन्ही लोक , । बाळसे गा ! ।।106।।
चौऱ्यांशी लक्ष योनी । तिये कांडा पेरां सांदणी ।
वाढे प्रतिदिनी । बाळक हे ।।107।।
नाना , देह अवयवी , । नामाची लेणी लेववी , ।
मोहस्तन्ये वाढवी । नित्य नवे ।।108।।
सृष्टी वेगवेगळीया । तिया करांघ्री आंगोळियां [21] ।
भिन्नाभिमान [22] सूदलिया [23] , । मुदिया [24] तेंथे ।।109।।
हें , एकलौतें चराचर । अविचारित [25] सुंदर ।
प्रसवोनि थोर । थोरावली [26] ।। 110।।
पै , ब्रह्मा प्रातःकाळु , । विष्णु तो माध्यान्ह वेळु , ।
सदाशिव सायंकाळु , । बाळा यया ।।111।।
महाप्रळयसेजें , । खेळोनि निवांत निजें , ।

1 त्रिगुण उत्पन्न होतात
2 लागलीच
3 वृक्षाचा आकार

4 अंकुर 5 टोकदार
6 आकारास
7 अंड्यापासून
8 घामापासून
9 वृक्षादि 10 मनुष्यादि

11 उत्पन्न होतो
12 आधिकपणा

13 वाढतें 14 कमी होतें

15 मदत करतात 16 सख्य होतें

17 पोट सुटले
18 आठ देवसर्ग 19 वरचे भाग
20 आनंदमय

21 बोटे 22 भिन्नभिन्न प्रकृतीचा अभिमान वाहणाऱ्या
23 घातल्या 24 आंगठ्या
25 अत्यंत सुंदर 26 धन्य झाली

विषमज्ञाने उमजें [1]। कल्पोदयी ।।112।।
अर्जुना ! , इयापरी ।मिथ्यादृष्टीच्या घरी , ।
युगानुवृत्तीची [2] करी । चोज [3] पाउले ।।114।।
संकल्पु जयाचा इष्टु [4] , । अहंकारु तो विनटु [5] ।
ऐसिया , होय शेवटु । ज्ञाने , यया ।।114।।
आतां असो हें बहु बोली , । ऐसे विश्व माया व्याली ।
तेंथ साह्य जाली । माझी सत्ता ।।115।।

1 विपरीत ज्ञानाने जागे होणे
2 युगपरंपरेची 3 कौतुकाने
4 आवडता 5 खेळगडी

सर्वयोनिषु कौन्तेंय मूर्तयः संभवन्ति या : ।
तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ।।4।।

पशु पक्ष्यादि सर्व योनीत ज्या ज्या मूर्ती जन्मास येतात त्यांची हें कौन्तेंया ! महत् ब्रह्म ही योनि असून मी बीजदाता पिता आहें .

या कारणे मी पिता । महदब्रह्म हें माता ।
अपत्य पंडुसुता ! । जगडंबरु ।।116।।
आतां , शरीरे बहुतें । देखोनि, न भेदे हो चित्ते , ।
जें , मनबुद्ध्यादि , भूतें । एकेचि येथें ।।117।।
हां गा ! एकाचि देही । काय अनारिसे अवयव नाही ? ।
तेवी , विचित्र विश्व पाही । एकचि हे ।।118।।
पै , उंचा , नीचा, डाहाळिया । विषमा वेगळालिया , ।
येकाचि जेवी जालिया , । बीजाचिया ।।119।।
आणि संबंधु तोही ऐसा , । मृत्तिके घटु लेंकु जैसा , ।
कां पटत्व , कापुसा । नातू होय ।।120।।
नाना , कल्लोळपरंपरा, । संतती जैसी सागरा , ।
आम्हां आणि चराचरा , । संबंधु तैसा ।।121।।
म्हणौनि , वन्हि आणि ज्वाळ , । दोन्ही वन्हीचि केवळ , ।
तेवी मी गा ! सकळ , । संबंधु वावो [6] ।।122।।
जालेंनि जगे , मी झांके , । तरी जगत्वे कोण फांके ? ।
किळेवरी [7] माणिके । लोपिजें काई ? ।।123।।
अळंकारातें आलें , । तरी सोनेपण काइ गेले ? ।
कीं कमळ फांकले , । कमळत्वा मुके ? ।।124।।

6 व्यर्थ
7 स्वतःच्या तेजाने

सांग पां धनंजया ! । अवयवी अवयविया ।
आच्छादिजें ? कीं तया । तेचि रूप ? ।।125।।
कीं विरूढलिया [1] जोंधळा , । कणिसाचा निर्वाळा [2] ।
वेचला [3] , कीं आगळा [4] , । दिसतसे ? ।।126।।
म्हणौनि , जग परौतें । सारूनि पाहिजें माते , ।
तैसा नोहे , उखितें [5] । आघवे , मीचि ।।127।।
हा , तूं , साचोकारा , । निश्चयाचा खरा ।
गांठी बांध वीरा , । जीवाचिये ।।128।।
आतां , मियां , मज दाविला , । शरीरी वेगळाला , ।
गुणी , मीचि बांधिला । ऐसा आवडे [6] ।।129।।
जैसे , स्वप्नी , आपण । उठूनिया आत्ममरण ।
भोगिजें गा , जाण , । कपिध्वजा ! ।।130।।
कां , कवळाते [7] , डोळे । प्रकाशूनि पिवळें ।
देखती , तेही कळे । तयांसीचि ।।131।।
नाना , सूर्यप्रकाशे । प्रकटी , तै अभ्र भासे , ।
तो लोपला , हेही दिसे , । सूर्येचि कीं ! ।।132।।
पै , आपणपेनि जालिया । छाया गा आपुलिया ।
बिहोनि , बिहालिया । आन आहे ? ।।133।।
तैसी , इये नाना देहे ।दाऊनि मी नाना होये , ।
तेंथ ऐसा जो बंधु आहे , । तेही देखे ।।134।।
बंधु कां न बंधिजें ? । हे जाणणे मज माझें , ।
नेणणेनि उपजे । आपलेनि ।।+135।।
तरी कोणे गुणे , कैसा , । मजचि मी बंधु ऐसा ।
आवडे , ते परियेसा । अर्जुनदेवा ! ।।136।।
गुण ते किती ? किंधर्म ? । कायि ययां रूपनाम ? ।
के जाले ? हें वर्म , । अवधारी पां ।।137।।

1 रुजलेला 2 पक्व
3 नाश पावतो 4 वाढलेला
5 जसेच्या तसे
6 भासतो
7 कावीळ झाली असता

सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः ।
निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ।।5।।

हें महाबाहो ! प्रकृतीपासून उत्पन्न झालेले सत्त्व, रज व तम हें गुण देहांत रहाणाऱ्या अव्ययास म्हणजे निर्विकार आत्म्यास देहांत बांधून टाकितात .

तरी सत्त्वरजतम , । तिघांसि हे नाम , ।
आणि प्रकृति जन्म-। भूमिका [8] ययां ।।138।।

8 स्थान

येथ सत्त्व तें उत्तम , । रज तें मध्यम , ।
तिहीमाजी तम , । सावियाधारे [1] ।।139।।
हें , एकेचि वृत्तीच्या ठायी [2] । त्रिगुणत्व आवडे , पाही ।
वयसात्रय देही । येंकीं , जेवी ।।140।।
कां , मीनलेनि कींडे [3], । जंव , जंव तूक [4] वाढे , ।
तंव , तंव , सोने , हीन पडे । पांचिका कसी [5] ।।141।।
पै , सावधपण जैसे , । वाहविले आळसे [6] ।
सुषुप्ति [7] बैसे , । घणावोनि [8] ।।142।।
तैसी , अज्ञानांगीकारे [9] । निघाली वृत्ति विखुरे [10] ।
तें सत्त्वरजद्वारे । तमही होये ।।143।।
अर्जुना गा ! जाण , । ययां नाम ' गुण ' , ।
आतां , दाखऊं खूण । बांधिती तें ।।144।।
तरी , क्षेत्रज्ञदशे , । आत्मा मोटका पैसे [11] , ।
' हें देह मी ' ऐसे । मुहूर्त करी [12] ।। 145।।
आजन्ममरणांती [13] । देहधर्मी समस्ती , ।
ममत्वाची सूती [14] । घे ना जंव [15] ।।146।।
जैसी , मीनाच्या तोंडी । पडेना जंव उंडी , ।
तंव , गळ आसुडी , । जळपारधी ।।147।।

1 सर्वथा कनिष्ट
2 अंतःकरणाच्या ठीकाणी
3 हिणकस सोने 4 वजन
5 पाचव्या प्रतीचे
6 आळसाने ग्रासले
7 निद्रा 8 गाढ
9 अज्ञानामुळे 10 पसरतें
11 अल्प प्रवेश करतो
12 सुरवात करतो
13 जन्मापासून मरेपर्यंत
14 अभिमान 15 घेतो ना घेतो तोच

तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम् ।
सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ ।।6।।

पैकीं निर्मल असल्यामुळे प्रकाश पाडणारा व निर्दोष असा जो सत्वगुण तो हें निष्पाप अर्जुना ! सुख आणि ज्ञान यांच्या संगाने प्राण्यास बांधून टाकतो

तेवी सत्त्वे लुब्धके [16] , । सुखज्ञानाची पाशके [17] ।
वोढिजती , मग खुडके [18] । मृगु जैसा ।।148।।
मग ज्ञाने , चडफडी , । जाणिवेचे , खुरखोडी [19] , ।
स्वयं सुख , हें धाडी [20] । हातीचे गा ! ।।149।।
तेव्हां , विद्यामाने तोखे , । लाभमात्रे हरिखे , ।
" मी संतुष्ट " हेही देखे , । श्लाघो लागे ।।150।।
म्हणे , ' भाग्य ना माझे ! ।आजि सुखिये नाही दुजें ' ।
विकाराष्टके फुंजें [21] । सात्त्विकाचेनि ।।151।।
अणि येणेही न सरे , । लांकण [22] लागे दुसरे ।
जें विद्वत्तेचे भरे । भूत आंगी ।।152।।

16 पारधी 17 फास
18 अडकतो
19 लाथा झाडतो
20 दवडतो
21 अष्टसात्त्विक भावांनी फुगु लागतो
22 बंधन

आपणचि ज्ञानस्वरूप आहे , । तें गेलें , हें दुःख न वाहे ।
कीं , विषयज्ञाने होये । गगनायेवढा ।।153।।
रावो जैसा स्वप्नी , । रंकपणे रिघे धानी [1] , ।
तो , दो दाणा [2] , मानी । इंद्रु ना मी ! ।।154।।
तैसे गा ! देहातीता , । जालेया देहवंता , ।
हो लागे पंडुसुता ! । बाह्यज्ञाने ।।155।।
प्रवृत्तिशास्त्र बुझे [3] । यज्ञविद्या उमजें ।
किंबहुना सुझे [4] । स्वर्गवरी [5] ।।156।।
आणि म्हणे , ' आजि आन । मीवांचूनि नाही सज्ञान ।
चातुर्यचंद्रा गगन । चित्त माझे ' ।।157।।
ऐसे सत्त्व सुखज्ञानी । जीवासि लावूनि कानी [6] ।
बैलाची करी वानी [7] । पांगुळाचिया ।।158।।
आतां , हाचि शरीरी । रजें जियापरी ।
बांधिजें , तें अवधारी , । सांगिजैल ।।159।।

1 शहरात
2 दोन दाण्यांच्या भिक्षेने
3 व्यवहारज्ञान जाणतो
4 समजतो 5 स्वर्गापेक्षा श्रेष्ठ
6 काढणी
7 या थराला आणतो

रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवम् ।
तन्निबध्नाति कौन्तेय कर्मसंगेन देहिनम् ।।7।।

रजोगुणाचा स्वभाव रंगविण्याचा असून तृष्णा वा आसक्ति ही यापासून उत्पन्न होतात असे समज. हें कौंतेया ! तो प्राण्याला कर्मे करण्याच्या प्रवृत्तिरुप संगाने बांधून टाकतो.

हें रज याचि कारणे , । जीवातें रंजऊं जाणे ।
हें अभिलाखाचे तरुणे [8]। सदाचि गा ।।160।।
हें जीवी मोटके रिगे , । आणि कामाच्या मदी लागे ।
मग , वारया वळघे [9]। तृष्णेचिया ।।161।।
घृतें आंबुखूनि [10] आगियाळे [11] ,। वज्राग्नीचे सादुकले [12] ।
आतां बहु , थेकुले । आहे तेंथ ? ।।162।।
तैसी , खवळे चाड , । होय दुःखासकट गोड , ।
इंद्रश्रीहि सांकड [13] । गमो लागे ।।163।।
तैसी ,तृष्णा वाढिनलिया,। मेरुहि [14] हाता आलिया,।
तऱ्ही म्हणे, ' एखादिया । दारुणा वळघो [15] ' ।।164।।
जीविताची कुरोंडी । वोवाळू लागे , कवडी , ।
मानी ,तृणाचिये जोडी ,। कृतकृत्यता ।।+165।।
आजि , असतें वेचिजेल , । परी पाहे [16] काय कींजेल , ।
ऐसा पांगी [17] , वडील [18] । व्यवसाय मांडी ।।166।।

8 अभिलाशाची वाढ
9 वाऱ्यावर आरुढ झाल्याप्रमाणे
वेगाने 10 शिंपडून 11 अग्नीकुंड
12 विजेच्या लोळाने भडकला
असता
13 संकुचित
14 सोन्याचा पर्वत
15 अधिक साहस प्रवृत्त होतो
16 उद्या सकाळी
17 आशेने 18 मोठा

म्हणे , ' स्वर्गा हन जावे । तरी काय तेंथे खावे ? ' ।
इयालागी धावे , । याग करु ।।167।।
व्रतापाठी व्रतें । आचरे , इष्टापूर्ते ।
काम्यावांचूनि हातें । शिवणे नाही ।।168।।
पै , ग्रीष्मांतीचा वारा , । विसांवो नेणे वीरा ! ।
तैसा , ' न म्हणे ' व्यापारा । रात्र दिवस ।।169।।
काय चंचळु मासा , । कामिनीकटाक्षु जैसा , ।
लवलाहो [1] तैसा । विजूही नाही ! ।।170।।
तेंतुलेनि गा ! वेगे , ।स्वर्गसंसारपांगे , [2] ।
आगीमाजी रिगे । क्रियांचिये ।।171।।
ऐसा , देही देहावेगळा , ।ले , तृष्णेचिया सांखळा , [3] ।
खटाटोपु वाहे गळा । व्यापाराचा ।।172।।
हें रजोगुणाचे दारुण , । देही देहियासी बंधन ।
परिस आतां , विंदाण [4] । तमाचे तें ।।173।।

1 चंचळ
2 ऐहिक व पारलौकिक सुखाच्या मागे
3 साखळदंड अडकवून घेतो
4 कौशल्य

तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् ।
प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ।।8।।

पण तमोगुण अज्ञानापासून उत्पन्न होऊन सर्व प्राण्यांना मोह घालणारा आहे असे समज. हें भारता ! तो प्रमाद , आळस व निद्रा यांनी त्यास बांधून टाकतो .

व्यवहाराचेहि डोळे ।मंद जेंणे पडळे [5] ।
मोहरात्रीचे काळे । मेहुडे [6] जें ।।174।।
अज्ञानाचे जियाले [7] । जया एका लागले , ।
जेंणे विश्व भुलले , । नाचत असे ।।175।।
अविवेकमहामंत्र । जें मौढ्यमद्याचे [8] पात्र ।
हें असो ; मोहनास्त्र । जीवांसी जें ।।176।।
पार्था तें गा ! ' तम ' । रचूनि ऐसे वर्म ।
चौखुरी [9] देहात्म-।मानियातें [10]।।177।।
हें एकचि कीर शरीरी । माजो लागे चराचरी , ।
आणि तेंथ दुसरी । गोठी नाही ।।178।।
सर्वेंद्रिया जाड्य , । मनामाजी मौढ्य , ।
माल्हाती [11] जें दार्ढ्य [12] । आलस्याचे ।।179।।
आंगे आंग मोडामोडी , । कार्यजाती अनावडी , ।
नुसती परवडी [13] । जांभयांची ।।180।।

5 पडदा
6 ढग
7 जगणे
8 अज्ञानरुपी मद्याचे पात्र
9 ताणून बांधतें 10 देहालाच आत्मा असें मानणारांना
11 आश्रय करतें
12 दृढपणे
13 रेलचेल

उघडियाची दिठी , । देखणे नाही किरीटी ! ।
नाळवितांचि , उठी। वो म्हणौनि ।।181।।
पडलिये धोंडी [1] । नेणे कानी मुरडी [2] ।
तयाचि परी मुरकुंडी [3] । उकलु नेणे ।।182।।
पृथ्वी पाताळी जावो , । कां आकाशही वरी येवो , ।
परी उठणे हा भावो । उपजो नेणे ।।183।।
उचितानुचित आघवे । झांसुरतां [4] नाठवे जीवे , ।
जेंथीचा तेंथ लोळावे , । ऐसी मेधा [5] ।।184।।
उभऊनि करतळे , । पडिघाय कपोळ [6] ।
पायाचे शिरियाळे [7] । मांडु लागे [8] ।।185।।
आणि निद्रेविषयी चांगु , । जीवी आथि लागु , ।
झोपी जातां स्वर्गु । वावो म्हणे ।।186।।
ब्रह्मायु [9] होईजें । मा , निजेलियाचि असिजें ।
हें वाचूनि दुजें , । व्यसन नाही ।।187।।
कां , वाटे जातां वोघे [10] । कल्हातांही [11] डोळा लागे ।
अमृतही परी नेघे । जरी नीद आली ।।188।।
तेवीचि , आक्रोशबळे [12] । व्यापारे कोणे एके वेळे ।
निगाले , तरी आंधळे । रोषे जैसे ।।189।।
केधवां , कैसे राहाटावे ?। कोणेसी काय बोलावे ?।
हें ठाकतें [13] , कीं नागवे [14] ,। हेही नेणे ।।190।।
वणवा , मियां आघवा । पाखें पुसोनि [15] घेयावा ।
पतंगु , पां , हांवी [16]। घाली जेवी , ।।191।।
तैसा , वळघे [17] साहसा । अकरणीच [18] धिवसा ।
किंबहुना ऐसा । प्रमादु रुचे ।।192।।
एवं ,निद्रालस्यप्रमादी । तम इया त्रिबंधी [19] ।
बांधे , निरुपाधी । चोखटातें [20] ।।193।।
जैसा वन्ही काष्ठी भरे , । तै दिसे काष्ठाकारे , ।
व्योम घटे आवरे [21] ,। ते घटाकाश ।।194।।
नाना , सरोवर भरले, । तै , चंद्रत्व तेंथे बिंबले ।
तैसें , गुणाभासी बांधले , । आत्मत्व गमे ।।195।।

1 धोंडा पडला असता 2 कुशीवर वळत नाही 3 आंगाचे गाठोडे

4 आळसावून पडले असता
5 बुद्धि
6 गाल धरून बसतो
7 गुडघा 8 आवळून धरतो

9 ब्रह्मदेवा एवढे आयुष्य

10 सहज 11 झोके घेतांना

12 जबरदस्तीने

13 साध्य 14 असाध्य
15 पंखांनी झाकून घेईन
16 इच्छा
17 प्रवृत्त होतो 18 निंद्य कर्म

19 निद्रा, आळस व प्रमाद या तीन पाशांनी 20 शुद्ध अशा चैतन्यास

21 व्यापतें

सत्त्वं सुखे सञ्जयति रजः कर्मणि भारत ।
ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे सञ्जयत्युत ।।9।।
रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत ।
रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा ।।10।।

सत्त्वगुण सुखाचे ठायी; व रजोगुण कर्माचे ठायी आसक्ति उत्पन्न करितो. परंतु हें भारता ! तमोगुण हा ज्ञानावर पांघरूण घालून प्रमाद म्हणजें कर्तव्याचा विसर याचे ठायी आसक्ति उत्पन्न करितो . रज व तम यांचा पाडाव करून सत्त्व वरचढ होतें तेव्हां त्याला सात्त्विक म्हणावयाचे; व त्याचप्रमाणे सत्त्व व तम यांचा पाडाव करून रज, आणि सत्त्व व रज यांचा पाडाव करून तम वरचढ होत असतें .

पै , हरूनि कफवात , । जै देही आटोपे [1] पित्त , ।
तै करी संतप्त । देह जेवी ।।+196।।
कां , वरिष आतप [2] जैसे । जिणौनि , शीतचि दिसे , ।
तेव्हां होय हिंव ऐसे , । आकाश हें ।।197।।
नाना , स्वप्न, जागृती । लोपूनि ये सुषुप्ती ।
तै क्षणु एक , चित्तवृत्ती । तेचि होय ।।198।।
तैसी , रजतमे हारवी, । जै , सत्त्व माजु मिरवी ।
तै , जीवाकरवी म्हणवी । '' सुखिया ना मी '' ।।199।।
तैसेचि सत्त्व ,रज । लोपूनि , तमाचे भोज ।
वळघे , तै सहज । प्रमादी होय ।।200।।
तयाचि गा परिपाठी ,। सत्त्व , तमातें पोटी ।
घालूनि , जेव्हां उठी ।रजोगुण , ।।201।।
तेव्हां , कर्मावाचूनि काही । आन गोमटे नाही , ।
ऐसे मानी देही । देहराजु ।।202।।
त्रिगुण वृद्धि निरुपण [3] ,। ती , श्लोकीं सांगितले जाण ।
आतां , सत्त्वादि वृद्धि लक्षण । सादर , परियेसी ।।203।।

1 वाढते
2 पाऊस , उन
3 तीन गुणांच्या वाढीचे विवेचन

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायतें ।
ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत ।।11।।
लोभः प्रवृत्तिरारम्भः कर्मणामशमः स्पृहा ।
रजस्येतानि जायन्तें विवृद्धे भरतर्षभ ।।12।।
अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ।
तमस्येतानि जायन्तें विवृद्धे कुरुनंदन ।।13।।
यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ।
तदोत्तमविदां लोकानमलान्प्रतिपद्यते ।।14।।
रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु जायतें ।
तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायतें ।।15।।

या देहांत सर्व द्वारात (इंद्रियात) प्रकाश म्हणजें निर्मल ज्ञान जेव्हां उत्पन्न होतें तेव्हां सत्त्वगुण वाढला आहे असे समजावे. हें भरतश्रेष्ठा ! रजोगुण वाढला म्हणजें लोभ, कर्माकडे प्रवृत्ति व त्यांचा आरंभ, अतृप्ति व इच्छा ही उत्पन्न होतात.

आणि हें कुरुनंदना ! तमोगुण वाढला म्हणजें अंधार, काही करूं नये असे वाटणे,प्रमाद म्हणजें कर्तव्याचा विसर आणि मोह हें देखील उत्पन्न होत असतात. सत्त्वगुणाचा उत्कर्ष झाला असता प्राणी मरण पावला, तर उत्तम तत्त्वे जाणणारांचे म्हणजें देवादिकांचे निर्मल स्वर्गादि लोक त्याला प्राप्त होतात. रजोगुणाचे प्राबल्य असतां मरण पावला तर कर्मात आसक्त झालेल्यांत (जनांत) जन्म घेतो; आणि तमोगुणात मेला तर पशुपक्ष्यादि मूढ योनीत जन्मतो

पै , रजतमविजये , । सत्त्व गा देही इये ।
वाढता , चिन्हे तिये । ऐसी होती ।।204।।
जें प्रज्ञा आंतुलीकडे । न समाती , बाहेरी वोसंडे ।
वसंती पद्मखंडे , । दृती [1] जैसी ।।205।। — 1 सुवास
सर्वेंद्रियांच्या आंगणी , । विवेक करी राबणी [2] । — 2 सेवा
साचचि करचरणी । होती डोळे ।।+206।।
राजहंसापुढे । चांचूचे आगरडे [3] । — 3 टोक
तोडी , जेवी झगडे । क्षीरनीराचे ।।207।।
तेवी , दोषादोषविवेकीं , । इंद्रियेचि होती पारखी [4] । — 4 निवाडा करणारी
नियमु बा रे ! पायिकीं [5] । वोळगे तै ।।208।। — 5 सेवा
नाइकणे,तें कानचि वाळी,। न पहाणे,ते,दिठीचि गाळी,।
अवाच्य तें ठाळी , । जीभचि गा ! ।।209।।
वाती [6] पुढां जैसे , । पळो लागे काळवसे [7] । — 6 दीवा 7 काळोख
" निषिद्ध " इंद्रियां तैसे । समोर नोहे ।।210।।
धाराधरकाळे [8]। महानदी उचंबळे , । — 8 पावसाळ्यात
तैसी बुद्धि पघळे । शास्त्रजाती ।।211।।
अगा ! पुनवेच्या दिवशी , । चंद्रप्रभा धांवे आकाशी ।
ज्ञानी वृत्ति तैसी , । फांके सैंध [9] ।।212।। — 9 पुष्कळ
वासना एकवटे , । प्रवृत्ति वोहटे , ।
मानस विटे , । विषयावरी ।।213।।
एवं , सत्त्व वाढे , । तै ,हें चिन्ह फुडे [10] । — 10 स्पष्ट होतात
आणि निधनही घडे । तेव्हांचि जरी , ।।214।।
कां , पाहालेनि [11], सुयाणे [12] । जालया परगुणे [13] । — 11 उजाडले कीं 12 सुकाळ
पढियंतें [14] पाहुणे । स्वर्गौनिया , ।।215।। — 13 पक्वान्नांचा 14 आवडतें
तरी,जैसीचि घरीची संपत्ती,। आणि तैसीचि औदार्यधैर्यवृत्ती ।
मा , परत्रा आणि कींर्ती । कां नोहावे ? ।।216।।
मग गोमटेया [15] तया । जावळी [16] असे धनंजया ? । — 15 चांगल्या 16 जोड
तेवी सत्त्वी जाणे देहा , । कें आथि गा ? ।।217।।

जें स्वगुणी उद्‌भट [1] । घेऊनि सत्त्व चोखट ।
निगे , सांडूनि कोपट [2] । भोगक्षम , हें ।।218।।
अवचटे ऐसा जो जाये , । तो सत्त्वाचाचि नवा होये ।
किंबहुना , जन्म लाहे । ज्ञानियांमाजी ।।219।।
सांग पां धनुर्धरा ! । रावो रायपणे डोंगरा ।
गेलिया , अपुरा । होय काई ? ।।220।।
नातरी , येथिचा दिवा , । नेलिया सेजिया [3] गावा , ।
तो तेंथें तरी पांडवा ! । दीपच कीं ! ।।221।।
तैसी , तें सत्त्वशुद्धी , । आगळी ज्ञानेसी वृद्धी , ।
तरंगावो [4] लागे बुद्धी , । विवेकावरी ।।222।।
पै , महदादि परिपाठी [5] । विचारूनि शेवटी ।
विचारासकट पोटी । जिरोनि जाय ।।223।।
छत्तिसां [6] , सदतिसावें , ।चोविसां पंचविसावें , ।
तिन्ही नुरोनि , स्वभावे । चतुर्थ [7] जें ।।+224।।
ऐसे सर्व जें सर्वोत्तम , । जाले असे जया सुगम , ।
तयासवे निरुपम , । लाहे देह ।।225।।
इयाचि परी देख । तमसत्त्व अधोमुख ।
बैसोनि , जै आगळीक [8]। धरी रज , ।।226।।
आपुलिया कार्याचा । धुमाड [9] गांवी देहाचा ।
माजवी , तै चिन्हांचा । उदयो ऐसा ।।227।।
पांजरली वाहटुळी [10] , । करी वेगळ वेटाळी [11] , ।
तैसी, विषयी सरळी [12] । इंद्रिया होय ।।228।।
परदारादि पडे , ।परी विरुद्ध , ऐसे नावडे [13] ।
मग शेळियेचेनि तोंडे ,। सैंध चारी ।। 229।।
हा ठायवरी [14] लोभु , । करी स्वैरत्वाचा राबु , ।
वेटाळिता [15] , अलाभु । ते , तें उरे ।।230।।
आणि आड पडलिया [16] । उद्यमजाती , भलतिया , ।
प्रवृत्ति [17] धनंजया ! । हातु न काढी ।।231।।
तेवीचि एखादा प्रासादु , । कां , करावा अश्वमेधु , ।
ऐसा अचाट छंदु , । घेऊनि उठी ।।232।।
नगरेचि रचावी , । जलाशये निर्मावी , ।
महावने लावावी । नानाविधे ।।233।।
ऐसैसां अफाटी कर्मी । समारंभु उपक्रमी [18] ।
आणि दृष्टादृष्ट [19] कामी । पुरे न म्हणे ।।234।।

1 श्रेष्ठ
2 झोपडी
3 जवळच्या
4 पोहु लागतें
5 महत्तत्त्वादि पदार्थांचा विचार करून
6 13 व्या अध्यायातील 36 तत्त्वाहून वेगळे 7 तिन्ही गुणांहून पैलीकडचे
8 वाढ
9 धुमाकुळ
10 पसरलेली वावटळ 11 सर्व गोष्टी एकत्र करते 12 मोकळी
13 भासत नाही
14 येथपर्यंत
15 गोळा करताकरता
16 समोर आलेले
17 काम करण्याची इच्छा
18 अचाट कामांचा आरंभ करतो 19 इहलोक व स्वर्ग

सागरुही सांडी पडे [1] , । आगी न लाहे तीन कवडे [2] ।
ऐसे अभिलषी जोडे , । दुर्भरत्व ।।235।।
स्पृहा [3] मना पुढां , पुढां , । आशेचा घे दवडा [4] ।
विश्व घापे चाडा [5] । पायांतळी ।।236।।
इत्यादि वाढता रजी , । इये चिन्हें होती साजी [6] ।
आणि ऐशा समाजी । वेचे जरी देह , ।।237।।
तरी आघवाचि इही , । परिवारला [7] आनी देही ।
रिगे , परी योनिही , । मानुषीचि ।।238।।
सुरवाडेसि [8] भिकारी , । वसो पां राजमंदिरी, ।
तरी काय अवधारी ! । रावो होईल ? ।।239।।
बैल तेंथे करबाडे [9] । हें न चुके गा फुडे [10] , ।
नेईजो कां वऱ्हाडे । समर्थाचेनी ।।240।।
म्हणौनि व्यापारा , हाती । उसंतु , दिहा ना राती ।
तैसयाचिये पांती [11] , । जुंपिजें तो ।।241।।
कर्मजडाच्या [12] ठायी ,। किंबहुना , होय देही , ।
जो , रजोवृत्तीच्या डोही । बुडोनि निमे ।।242।।
मग तैसाचि पुढती , । रजसत्त्ववृत्ती ।
गिळूनि , ये उन्नती । तमोगुण , ।।243।।
तैचि , जिये लिंगे [13]। देहीची सबाह्य , सांगे , ।
तिये परिस चांगे । श्रोत्रबळे ।।244।।
तरी होय ऐसे मन , । जैसे रविचंद्रहीन ।
रात्रीचे का गगन । अंवसेचिये ।।245।।
तैसे , अंतर असोस [14] । होय , स्फूर्तिहीन उद्वस [15] , ।
विचाराची भाष । हारपे , तै ।।2 46।।
बुद्धि मेचवेना [16] , धोंडी । हा ठायवरी, मवाळे सांडी [17] ,।
आठवो [18] , देशधडी । जाला दिसे ।।247।।
अविवेकाचेनि माजें , । सबाह्य शरीर गाजें , ।
एकलेनि , घेपे , दीजे । मौढ्य तेंथ ।। 248।।
आचारभंगाची हाडे [19] , । रुपती इंद्रियापुढे ।
मरे जरी तेंणेकडे [20] , । क्रिया जाय ।।249।।
पै , आणिकही एक दिसे , । जें दुष्कृती चित्त उल्हासे , ।
आंधारी देखणे जैसे , । डुडुळाचे [21] ।।250।।
तैसें , निषिद्धाचेनि नांवे , । भलतेही भरे हांवे , ।
तियेविषयी , धांवे । घेती ,करणे [22] ।।251।।

1 हार खाईल 2 तीन कवड्या
3 हांव 4 धांव
5 इच्छा
6 सज्ज होतात
7 घर करतो
8 चैनिने
9 कडबा 10 निश्चित
11. पंक्तिला
12 कर्मठ
13 लक्षणे
14 अंतःकरण पूर्णपणे
15 रिकामे
16 मोजता येणार नाही इतके
17 मार्दव 18 स्मरण
21 सदाचारभंग रुपी हाडे
20 त्यामुळे मरणप्राय दुःख झाले तरी
21 घुबडाचे
22 इंद्रिये

मदिरा न घेतां डुले , । सन्निपातेवीण [1] बरळे , ।
निष्प्रेमेचि भुले , । पिसे [2] जैसे ।।252।।
चित्त तरी गेले आहे , । परी , ' उन्मनी [3] ' तें नोहे ।
ऐसे माल्हातिजे [4] मोहे । माजिरेनि [5] ।।253।।
किंबहुना , ऐसैसी । इये चिन्हें तम पोषी , ।
जै , वाढे आयितीसी [6] । आपुलिया ।।254।।
आणि हेचि होय , प्रसंगे । मरणाचे जरी पडे खागे [7] , ।
तरी तेंतुलेनि निगे । तमेसी तो ।। 255।।
राई , राईपण बीजी । सांठवूनियां अंग त्यजी , ।
मग विरूढे , तै, दुजी । गोठी आहे ? ।।256।।
पै , होऊनि दीपकलिका , । येरु आगी विझो कां , ।
कां , जेंथ लागे तेंथ असका [8] , । तोचि आहे ।।+257।।
म्हणौनि तमाचिये लोथे [9] , । बांधोनिया संकल्पातें ।
देह जाय , तै मागौते । तमाचेचि होय ।।258।।
आतां काय येणे बहुवे [10] ! । जो तमोवृद्धि मृत्यु लाहे , ।
तो पशु कां पक्षी होये । झाड कां कृमी ।।259।।

1 वात,पित्त व कफ यांच्या एकत्र जोराने येणारा ताप
2 वेडा 3 समाधी
4 आश्रय करणे 5 मादक पदार्थ
6 सामुग्रीसकट
7 फळास येतें तेव्हां
8 संपूर्ण
9 गाठोडे
10 फार काय सांगावे

कर्मणः सुकृतस्याहुः सात्त्विकं निर्मलं फलम् ।
रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम् ।।16।।

पुण्य कर्माचे फल निर्मल व सात्त्विक, पण राजस कर्माचे फल दुःख , आणि तामस कर्माचे फल अज्ञान होय , असे म्हटले आहे

येणेचि पै कारणे , । जें निपजें सत्त्वगुणे , ।
तें सुकृत ऐसे म्हणे । श्रौत समो [11] ।।260।।
म्हणौनि तया निर्मळा ,।सुखज्ञानी , सरळा , ।
अपूर्व ये फळा। सात्त्विक तें ।।261।।
मग राजसा जिया क्रिया,। तया,इंद्रावणी [12] फळलिया,।
जें सुखे चितारूनिया , । फळती दुःखे ।।262।।
कां , निंबोळियेचे पिक , । वरि गोड आंत विख , ।
तैसें , तें राजस देख , । क्रियाफळ ।।263।।
तामस कर्म जितुके , । अज्ञान फळेचि पिके , ।
विषांकुर , विखे । जियापरी ।।264।।

11 श्रुतीचा संकेत आहे
12 कडु वृंदावने (एक फळ)

सत्त्वात्संजायतें ज्ञानं रजसो लोभ एव च ।
प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ।। 17।।

सत्त्वापासून ज्ञान ,तर रजोगुणापासून केवळ लोभ उत्पन्न होतो. तमोगुणापासून प्रमाद व मोहच नव्हे तर अज्ञानहि उत्पन्न होतें

म्हणौनि बा रे अर्जुना ! । येथ सत्त्वचि हेंतु ज्ञाना , ।
जैसा कां दिनमाना , । सूर्य हा पै ।।265।।
आणि तैसेचि हें जाण, । लोभासि रज कारण ।
आपुले विस्मरण , । अद्वैता[1] जेवी ।।266।।
मोह , अज्ञान , प्रमादा , । ययां मैळेया[2] दोषवृंदा ।
पुढती , पुढती , प्रबुद्धा । तमचि मूळ ।।267।।
ऐसे विचाराच्या डोळा , । तिन्ही गुण वेगवेगळां ।
दाविले , जैसा आंवळा । तळहातीचा ।।268।।
तंव , रजतमे दोन्ही । देखिली प्रौढपतनी[3]।
सत्त्वावांचूनि नाणी[4] । ज्ञानाकडे ।।269।।
म्हणौनि सात्त्विक वृत्ती । एक जाले गा जन्मव्रती ।
सर्वत्यागे चतुर्थी । भक्ती जैसी ।।270।।

1 सर्वैक्यस्वरुपास
2 मिळून
3 पतन करण्यास समर्थ
4 आणीत नाही

ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः ।
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ।।18।।

सात्त्विक पुरुष वरच्या म्हणजें स्वर्गादि लोकांस जातात. राजस मध्यम म्हणजें मनुष्यलोकीं रहातात आणि कनिष्ठ -गुणवृत्तीचे तामस अधोगतीस जातात.

तैसे सत्त्वाचेनि नटनाचे[5] । असणे , जाणे जयांचे ।
तें तनुत्यागी स्वर्गीचे । राय होती ।।271।।
इयाचि परी रजें । जिही कां जीजें , मरिजें , ।
तिही मनुष्य होईजें । मृत्युलोकीं ।।272।।
तेंथ सुखदुःखाचे खिचटे[6]। जेविजें एकेचि ताटे ।
जेंथ इये , मरणवाटे । पडिले , नुठी[7] ।।273।।
आणि तयाचि स्थिती तमी,।जे वाढोनि निमती भोगक्षमी[8]।
तें घेती नरकभूमी । मूळपत्र[9] ।।274।।
एवं , वस्तुचिया सत्ता । त्रिगुणासी , पंडुसुता ! ।
दाविली सकारणता । आघवीचि ।।275।।
पै,वस्तु,वस्तुत्वे असिके[10],। ते आपणपें गुणासारिखे ।
देखोनि , कार्यविशेखे । अनुकरे , गा ! ।।276।।
जैसे कां , स्वप्नीचेनि , राजें । जै , परचक्र देखिजें , ।
तै , हारी , जैत होइजें । आपणपाचि ।।277।।

5 उत्कर्ष
6 खिचडी
7 सुटत नाही
8 भोगण्यास योग्य
9 सनद
10 संपूर्ण

तैसे, मध्योर्ध्व , अध, । हे जें गुणवृत्तिभेद , ।
तें दृष्टीवांचूनि शुद्ध । वस्तुचि असे ।।278।।

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टाऽनुपश्यति ।
गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ।।19।।

द्रष्टा म्हणजें उदासीनपणाने पहाणारा पुरुष, प्रकृतीच्या गुणाखेरीज दुसरा कोणी कर्ता नाही असे जेव्हां जाणितो, व तिन्ही गुणांच्या पलीकडचे तत्त्व ओळखितो, तेव्हां तो माझ्या स्वरुपाला पोचतो .

परी हें वाहणी [1] असो ; । तरी तुज आन न दिसो ।
परिसे तें सांगतसो । मागील गोठी ।।279।।
तरी ऐसे जाणिजें । सामर्थ्ये तिन्ही सहजें ।
होती देहव्याजें [2] । गुणचि हें ।।280।।
इंधनाचेनि आकारे , । अग्नि जैसा अवतरे , ।
कां आंगवे [3], तरुवरे , । भूमिरसु ।।281।।
नाना , दहियाचेनि मिसे [4] । परिणमे दूधचि जैसे ।
कां , मूर्त होय , ऊसे ,। गोडी जेवी ।282।।
तैसे हें स्वांतःकरण [5] , । देहचि होती त्रिगुण ।
म्हणौनि बंधासि कारण । घडे कीर ।।283।।
परी चोज [6] हे धनुर्धरा ! । जे एवढा हा गुंफिरा [7] , ।
मोक्षाचा संसारा [8] । उणा , नोहे ।।284।।
त्रिगुण आपुलालेनि धर्मे , । देहीचे माघुत साउमे [9] ।
चाळिताही [10] , न खोमे । गुणातीतता [11]।। 285।.
ऐसी मुक्ति असे सहज , । ते आतां परिसऊं तुज , ।
जें तूं ज्ञानांबुज-।द्विरेफु [12] कीं ! ।।286।।
आणि , गुणी गुणाजोगे । चैतन्य नोहे , मागे ।
बोलिलो , तें खागे [13] । तेवीचि हें ।।287।।
तरी पार्था ! जै ऐसे । बोधलेनि जीवे दिसे , ।
स्वप्न कां जैसे , । चेइलेनी ।।288।।
नातरी , आपण जळी । बिंबलो , तीरोनी न्याहाळी ।
चळण होतां कल्लोळी । अनेकधा ।।289।।
कां , नटलेनि लाघवे [14] , । नटु जैसा न झकवे [15] , ।
तैसें , गुणजात देखावे । न होनियां ।।290।।
पै , ऋतुत्रय , आकाशे । धरूनियाहि , जैसे ।
नेदिजेचि येवो वोसे [16] , । वेगळेपणा ।।291।।

1 बोलण्याचा ओघ
2 देहाच्या निमित्ताने
3 आकाराच्या रुपाने
4 निमित्ताने
5 अंतःकरणासह
6 नवल 7 गुंता
8 आत्म्याची स्वरुप स्थितीत
9 साक्षात मागेपुढे
10 प्रवर्तता 11निर्गुण आत्म्याला कमीपण नाही
12 ज्ञानरुपी कमळाचा स्वाद घेणारा भुंगा
13 ठिकाण
14 कौशल्याने 15 स्वतः फसत नाही
16 न्युनता

तैसे गुणी गुणापरौतें ।जें आपणपें असे आयितें ।
तिये अहं बैसे अहंतें । मूळकेचिये [1] ।।292।।
पै , तेथूनि मग पाहतां , । म्हणे साक्षी मी , अकर्ता , ।
हें गुणचि क्रियाजातां । नियोजित ।।293।।
सत्त्वरजतमांचा । भेदी , पसरु कर्मांचा ।
होत असे ,तो गुणांचा । विकारु हा ।।294।।
ययामाजी मी ऐसा , । वनी कां , वसंतु जैसा ।
वनलक्ष्मीविलासा । हेंतुभुत ।।295।।
कां , तारांगणी लोपावे , । सूर्यकांती उद्दीपावे , ।
कमळी विकासावे , । जावे तमे ।।296।।
ये , कोणाची काजें कही । सवितिया जैसी नाही , ।
तैसा , अकर्ता मी देही । सत्तारूप ।।297।।
मी दाऊनि गुण देखे । गुणता , हें मिया पोखे [2] ।
ययाचेनि निःशेखे । उरे तें मी ।।298।।
ऐसेनि विवेके जया । उदो होय , धनंजया ! ।
ये गुणातीतत्व तया । अर्थपंथे [3] (उर्ध्वपंथे) ।।299।।

1 मूळ अहंब्रह्मास्मी या स्थितीत

2 पोसली जाते

3 ज्ञानमार्गावर

गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान् ।
जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुतें ।।20।।

देहधारी मनुष्य देहोत्पत्तीस कारण झालेल्या या तिन्ही गुणांच्या पलीकडे जाऊन जन्म, मृत्यु जरा यांच्या दुःखानी विमुक्त होत्साता अमृताचा म्हणजें मोक्षाचा अनुभव घेतो

आतां निर्गुण असें आणीक , । ते तो जाणे अचुक ।
जें ज्ञाने केले टीक [4] । तयाचिवरी ।।300।।
किंबहुना , पंडुसुता ! । ऐसी तो माझी सत्ता ।
पावे , जैसी सरिता । सिंधुत्व गा ! ।।301।।
नळिकेवरुनि उठिला , । जैसा शुक शाखे बैसला , ।
तैसा , मूळअहंतें वेठिला [5] । तो ,' मी ' , म्हणौनि ।।302।।
अगा ! अज्ञानाचिया निदा , । जो घोरत होता बदबदा , ।
तो स्वस्वरूपी , प्रबुद्धा ! । चेइला कीं ! ।।303।।
पै , बुद्धिभेदाचा आरिसा । तया हातोनि पडिला , वीरेशा ! ।
म्हणौनि , प्रति-मुखाभासा [6] , । मुकला तो ।।304।।
देहाभिमानाचा वारा । आतां वाजो ठेला [7] , वीरा ! ।
तै , ऐक्य , वीचिसागरां [9] , । जीवेशां , हे ।।305।।

4 टिळा

5 मूळच्या अहंभावे वेढला आहे

6 प्रतिबिंबरुप दिसणारा भास 7 थांबला

8 सागर व त्यावरची लाट

म्हणौनि , मद्भावेसी । प्राप्ति पाविजे तेंणेसरिसी , ।
वर्षांती आकाशी । घनजात जेवी ।।306।।
तेवी , मी होऊनि निरुता [1] । मग देहीचि ये असतां , ।
नांगवे [2] देहसंभूतां । गुणांसि [3] , तो ।।307।।
जैसा , भिंगाचेनि [4] घरे । दीपप्रकाशु नावरे , ।
कां , न विझेचि सागरे । वडवानळु ।।308।।
तैसा , आलागेला गुणांचा , । बोधु , न मैळे तयाचा ।
तो देही , जैसा व्योमीचा । चंद्र , जळी ।।309।।
तिन्ही गुण आपुलालिये प्रौढी [5] । देही नाचविती बागडीं [6] ।
तो , पाहोही न धाडी [7] । अहंतेंतें [8] ।।310।।
हा ठायवरी [9] । नेहटोनि [10] ठेला अंतरी , ।
आतां काय वर्ते शरीरी , । हेही नेणे ।।311।।
सांडूनि आंगीची खोळी , । सर्प रिगालिया पाताळी , ।
तें त्वचा कोण सांभाळी ! । तैसे जाले ।।312।।
कां,सौरभ्य जीर्णु [11] जैसा,।आमोदु [12] मिळोनि जाय आकाशा ।
माघारा कमळकोशा । नयेचि तो ।।313।।
पै , स्वरूपसमरसे , । ऐक्य गा ! जाले तैसे ।
तेंथ ' किंधर्म [13] ' हे कैसे । नेणे देह ।।314।।
म्हणौनि , जन्मजरामरण , । इत्यादि जें साही गुण , ।
तें देहीचि ठेले कारण [14] , । नाही तया ।।315।।
घटाचिया खापरिया , । घटभंगी फेडिलिया , ।
महदाकाश , अपैसया [15] । जालेचि असे ।।316।।
तैसी , देहबुद्धी जाये , । जै , आपणपां आठौ होये [16] , ।
तै , आन काही आहे । तेवाचूनि ? ।।317।।
येणे थोर बोधलेपणे , । तयासि गा ! देही असणे ।
म्हणूनि तो मी म्हणे । गुणातीत ।।318।।
यया देवाचिया बोला , । पार्थु अति सुखावला ।
मेघे संबोखिला [17] । मोरु जैसा ।।319।।

1 निश्चितपणे
2 अडकत नाही 3 देहापासून उद्भवणाऱ्या गुणात
4 अभ्रकाच्या
5 सामर्थ्याने 6 चेष्टा करतात
7 क्षणभर सोडत नाही
8 अहंब्रह्मस्वरुप भाव
9 येथपर्यंत 10 निश्चय केला
11 शिळा सुगंध
12 सुवास
13 धर्म वगैरे काय
14 हेतु
15 आपोआप
16 आठवण होणे
17 तृप्त केला

अर्जुन उवाच

कैर्लिंगैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवती प्रभो ।
किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ।।21।।

हें प्रभो ! कोणत्या लक्षणांनी या तीन गुणांच्या पलीकडे जातो म्हणावयाचा ? त्या त्रिगुणातीताचा आचार कसा आणि तो या तीन गुणांच्या पलीकडे कसा जातो ? हें मला सांगा .

तेंणे तोषे , वीर पुसे । ' जी ! कोण्ही चिन्ही तो दिसे ।
जयामाजी वसे । ऐसा बोधु ? ।।320।।
तो निर्गुण काय आचरे ? । कैसेनि गुण निस्तरे ? ।
हें सांगिजो माहेरे । कृपेचेनि '' ।।321।।
यया अर्जुनाचिया प्रश्ना । तो षड्गुणांचा राणा ।
परिहारु [1]आकर्णा [2] । बोलतु असे ।।322।।
म्हणे , '' पार्था तुझी नवाई [3] । हें येतुलेचि पुससी काई ? ।
तें नामचि तया पाही । सत्य लटिके ।।+23।।
गुणातीत जया नांवे , । तो गुणाधीन तरी नव्हे , ।
ना , होय , तरी नांगवे [4] । गुणां यया ।।+324।।
परी अधीन कां नांगवे , । हेचि कैसेनि जाणावे ,।
गुणांचिये रवरवे-। माजी असतां ? ।+325।।
हा संदेह जरी वाहसी , । तरी सुखे पुसो लाहसी ।
परिस आतां तयासी । रूप करूं ।।326।।

1 निराकारण करण्याकरिता
2 ऐकून 3 नवल वाटते
4 स्वाधीन न होणे

श्रीभगवानुवाच
प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पांडव ।
न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि काङ्क्षति ।।22।।
हें पांडवा ! प्रकाश, प्रवृत्ति आणि मोह म्हणजे अनुक्रमे सत्त्व, रज व तम या गुणांची कार्ये किंवा फले प्राप्त झाली तरी त्यांचा जो द्वेष करीत नाही, आणि प्राप्त न झाली तरी त्यांची आकांक्षा ठेवीत नाही

तरी रजाचेनि माजें । देही कर्माचे आणोजें [5] ।
प्रवृत्ति जै घेईजे । वेटाळुनि , ।।327।।
तै , मीचि कां कर्मठ [6] । ऐसा न ये श्रीमाठ [7] ।
कां , दरिद्रलिये [8] , बुद्धि वीट [9] , । तोही नाही ।।328।।
अथवा सत्त्वेचि अधिके , । जै सर्वेंद्रियी ज्ञान फाकें , ।
तै सुविद्यता , तोखे [10] , । उभजेही [11] ना ।। 329।।
कां , वाढिन्नलेनि तमे , । न गिळिजेचि मोहभ्रमे , ।
तै अज्ञानत्वे न श्रमे । घेणेही नाही ।।330।।
पै , मोहाच्या अवसरी , । ज्ञानाची चाड न धरी , ।
ज्ञाने , कर्मे नादरी [12], । होतां [13] , न दुःखी ।।331।।
सायंप्रातर्मध्यान्हा । या तिन्ही काळांची गणना ।
नाही जेवी तपना [14] , । तैसा असे ।।332।।
तया वेगळाचि काय प्रकाशे । ज्ञानित्व यावे असे ? ।
कायि जळार्णव [15] , पाउसे । साजा [16] होय ? ।।333।।

5 अंकुर
6 कर्म करणारा 7 अहंकार
8 अपूर्ण झाले असता
9खेद
10 तोषणे 11 खेद पावणे
12 बडेजाव करीत नाही
13 कर्म घडले असता
14 सूर्य
15 सागर 16 पूर्ण भरलेला

ना , प्रवर्तलेनि कर्मे । कर्मठत्व तयां कां गमे ? ।
सांगें , हिमवंतु हिमे । कांपे कायी ? ।।334।।
नातरी , मोह आलिया । काई पां , ज्ञाना मुकिजैल तया ? ।
हो , मा , आगीतें उन्हाळेया । जाळवत असे ? ।।335।।

उदासीनवदासीनो गुणेर्यो न विचाल्यते ।
गुणा वर्तन्तें इत्येव योऽवतिष्ठति नेङ्गतें ।।23।।

कर्मफलाबद्दल तो उदासीनासारखा रहाणारा; सत्त्व,रज व तम हे गुण ज्याला चाळवू शकत नाहीत, गुण आपआपले करीत आहेत एवढेच मानून जो स्थिर रहातो, म्हणजें विकार पावत नाही

तैसें , गुणागुणकार्य हें । आघवेचि आपण आहे , ।
म्हणौनि , एकेका नोहे । तडातोडी [1] । ।336।।
येवढे गा प्रतीती । तो देहा आलासे वस्ती , ।
वाटे जातां गुंती-। माजी जैसा ।।337।।
तो जिणता ना हारवी , । तैसा गुण नव्हे , ना करवी ।
जैसी कां श्रोणवी [2] । संग्रामीची ।।338।।
कां , शरीराआंतील प्राणु , । घरी आतिथ्याचा ब्राह्मणु ।
नाना , चोहटांचा स्थाणु [3] । उदासु जैसा ।।339।।
आणि गुणाचा यावाजावा , । ढळे चळे ना पांडवा ! ।
मृगजळाचा हेलावा । मेरु जैसा ।।340।।
हें बहुत कायि बोलिजें ! । व्योम वारेनि न वचिजें , ।
कां , सूर्य ना गिळिजें । अंधकारे ।।341।।
स्वप्न कां गा ! जियापरी , । जागतयाते न सितरी [4] ।
गुणी तैसा अवधारी । न बंधिजे तो ।।342।।
गुणासि कीर नातुडे [5] । परी दुरूनि जै पाहे कोडे [6] , ।
तै , गुणदोष सायिखडे [7] । सभ्यु [8] जैसा ।।343।।
सत्कर्मे सात्त्विकीं , । रज ते रजोविषयकीं , ।
तम मोहादिकी । वर्तत असे ।।344।।
परिस , तयाचिया गा सत्ता । होती गुणक्रिया समस्ता ।
हें फुडे जाणे , सविता । लौकिका जेवी ।।345।।
समुद्रचि भरती , । सोमकांतचि द्रवती , ।
कुमुदे विकासती , ।चंद्रु तो उगा ।।346।।
कां , वाराचि वाजे विझे । गगने निश्चळ असिजें , ।
तैसा गुणाचिये गजबजें । डोलेना जो ।।347।।

1 विस्कळीत
2 युद्ध भुमी
3 चौरस्त्यावरील खांब
4 भ्रमात पाडणे
5 स्वाधीन न होणे 6 कौतुकाने
7 बाहुल्यांचा खेळ 8 सज्जन प्रेक्षक

अर्जुना ! येणे लक्षणे । तो गुणातीतु जाणणे ।
परिस आतां आचरणे । तयाची जी ।।348।।

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकांचन : ।
तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः ।।24।।

ज्याला सुख व दुःख सारखेच; जो स्व-स्थ म्हणजें आपल्या ठिकाणीच स्थिर झाला; माती, दगड व सोने ही ज्याला सारखीच ; प्रिय व अप्रिय , निंदा व आपली स्तुति ही ज्याला समसमान; सदा धैर्याने युक्त

तरी , वस्त्रासि पाठी पोटी । नाही सुतावाचूनि , किरीटी ! ।
एसे सुये दिठी । चराचर मद्रूपे ।।349।।
म्हणौनि , सुखदुःखासरिसे । कांटाळे [1] , आचरे ऐसे । — 1 तोलणे
रिपुभक्तां जैसे । हरीचे देणे ।।350।।
एऱ्हवी तरी सहजें , । सुखदुःख तैचि सेविजें ,।
देहजळी होईजे । मासोळी जै ।।351।।
आतां , तें तंव तेंणे सांडिले । आहे स्वस्वरूपेसीचि मांडिले ।
सस्यांती [2] निवडिले । बीज जैसे ।।352।। — 2 धान्य कापण्याचे वेळी
कां , वोघ सांडूनि गांग । रिघोनि समुद्राचे आंग , ।
निस्तरली लगबग । खळाळाची ।।353।।
तेवी , आपणपांचि जया । वस्ती जाली , गा धनंजया ! ।
तया देही अपैसया । सुख , तैसे दुःख ।।354।।
रात्रि तैसे पाहले [3] । हें ,धारणा [4] ,जेवी एक जाले । — 3 उजाडले 4 समजुत
आत्माराम देही आतलें । द्वंद्व तैसे ।।355।।
पै , निद्रिताचेनि आंगेशी , । साप तैशी उर्वशी , ।
तेवी स्वरूपस्था , सरिशी । देही द्वंद्वे ।।356।।
म्हणौनि , तयाच्या ठायी । शेणा सोनया विशेष नाही ।
रत्ना गुंडेया काही । नेणिजे भेदु ।।357।।
घरा येवो पां स्वर्ग , । कां , वरिपडो वाघ , ।
परी आत्मबुद्धिसि भंग , । कदा नोहे ।।358।।
निवटले [5] न उपवडे [6] , । जळिनले न विरूढे [7] , । — 5 मेलेला 6 जागा होत नाही
साम्यबुद्धि न मोडे । तयापरी ।।359।। — 7 रुजत नाही
हा ब्रह्मा ऐसेनि स्तविजो । कां , नीच म्हणौनि निंदिजो , ।
परी नेणे जळो विझों । राखोंडी जैसी ।।+360।।
तैसी , निंदा आणि स्तुति । नये कोण्हेचि व्यक्ति [8] । — 8 परिणाम होत नाही
नाही अंधारे , कां वाती [9]। सूर्या घरी ।।361।। — 9 उजेड

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयो : ।
सर्वारंभपरित्यागी गुणातीत : स उच्यतें ।।25।।

ज्याला मान व अपमान किंवा मित्र व शत्रुपक्ष तुल्य म्हणजें एकसारखे ; आणि प्रकृति सर्व करितें असे समजल्यामुळे ज्याचे सर्व काम्य उद्योग सुटले, त्या पुरुषास गुणातीत असे म्हणतात.

ईश्वर म्हणौनि पूजिला , । कां , चोरु म्हणौनि गांजिला , ।
वृषगजी वेढिला , । केला रावो , ।।362।।
कां सुहृद पासी आले , । अथवा वैरी वरपडे [1] जाले , ।
परी नेणे , राती पाहाले । तेंज जेवी ।।363।।
साही ऋतु येतां आकाशे , । लिंपिजेचि ना जैसे , ।
तेवी वैषम्य मानसे । जाणिजेंना ।।364।।
आणीकही एकु पाही । आचारु , तयाच्या ठायी , ।
तरी , व्यापारासि , नाही । जाले , दिसे ।।+365।।
सर्वारंभा उटकले [2] , । प्रवृत्तीचे तेथ मावळले , ।
जळती गा कर्मफळे । तें तो आगी ।।366।।
दृष्टादृष्टाचेनि नांवे । भावचि जीवी नुगवे ।
सेवी जें कां स्वभावे । पैठे [3] होय ।।367।।
सुखे ना शिणे , । पाषाणु कां जेंणे माने ।
तैसी सांडीमांडी मने । वर्जिली असे ।।368।।
आतां किती हा विस्तारु ! । जाणे ऐसा आचारु ।
जयाते , तोचि साचारु [4] । गुणातीतु ।।369।।
गुणांतें अतिक्रमणे , । घडे उपाये जेंणे , ।
तो आतां आईक , '' म्हणे ।श्रीकृष्णनाथु ।।370।।

1 प्राप्त झाले
2 दूर झाले
3 प्राप्त
4 खरोखर

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ।।26।।

आणि जो सर्व कर्मे मलाच अर्पण करण्याच्या अव्यभिचार म्हणजें एकनिष्ठ भक्तियोगाने माझी सेवा करितो तो या तीन गुणांच्या पलीकडे जाऊन ब्रह्मभूतावस्था प्राप्त करून घेण्यास समर्थ होतो

तरी व्यभिचाररहित चित्तें । भक्तियोगे माते ।
सेवी , तो गुणातें । जाकळूं [5] शके ।।371।।
तरी कोण मी? कैसी भक्ती?। अव्यभिचारा काय व्यक्ती [6] ? ।
हें आघवीचि निरुती [7] । होआवी लागे ।।372।।
तरी पार्था ! परियेसा । मी तंव येथ ऐसा , ।
रत्नीं किळावो [8] जैसा । रत्नचि कीं तो ।।373।।

5 जिंकु
6 चिन्हे
7 निश्चीती
8 रत्ना चे तेज

कां , द्रवपणचि नीर , । अवकाशचि अंबर , ।
गोडी तेचि साखर । आन नाही ।।374।।
वन्हि तेचि ज्वाळ , । दळाचि नांव कमळ , ।
रुख तेचि डाळ- [1] । फळादिक ।।375।।
अगा ! हिम जे आकर्षले [2] । तेचि हिमवंत जेवी जाले , ।
नाना , दूध मुराले [3] । तेचि दही ।।376।।
तैसे , विश्व येणे नांवे , । हें मीचि पै , आघवें ।
घेई ,चंद्रबिंब सोलावे । न लगे जेवी ।।377।।
घृताचे थिजलेपण । न मोडिता , घृतचि जाण ।
कां , नाटिता कांकण । सोनेचि तें ।।378।।
न उकलिता पटु , । तंतुचि असे स्पष्टु , ।
न विरवितां घटु , । मृत्तिका जेवी ।।379।।
म्हणौनि , विश्वपण जावे , । मग मातें घेयावे , ।
तैसा नव्हे , आघवे । सकटचि मी ।।380।।
ऐसेनि मातें जाणिजे , । तें, अव्यभिचारी भक्ति म्हणिजे ।
येथ भेद काही देखिजें , । तरी व्यभिचारु तो ।।381।।
याकारणे भेदांतें । सांडुनि , अभेदे चित्ते ।
आपणा सकट मातें । जाणावे गा ! ।।382।।
पार्था ! सोनियाची टिका [4] । सोनियासी लागली देखा ।
तैसे , आपणपें , आणिका , । मानावे ना ।।383।।
तेंजाचा तेजौनि निघाला , । परी तेंजीचि असे लागला ।
तया रश्मी ऐसा भला । बोधु होआवा ।।384।।
पै , परमाणु भूतळी , । हिमकणु हिमाचळी , ।
मजमाजी न्याहाळी । अहं [5] , तैसे ।।385।।
हो कां तरंगु लहानु , । परी सिंधूसी नाही भिन्नु , ।
तैसा , ईश्वरु मी आनु, । नोहेचि मा ! ।।386।।
ऐसेनि बा ! समरसे , । दृष्टि जें उल्हासे [6] ।
तें भक्ति , पै, ऐसे । आम्ही म्हणो ।।387।।
आणि ज्ञानाचे चांगावे [7] , । इयेचि दृष्टि नांवे [8] ।
योगाचेही आघवे , । सर्वस्व हें ।।388।।
सिंधु आणि जळधरा-। माजी , लागली अखंड धारा , ।
तैसी , वृत्ति [9] वीरा ! । प्रवर्ते तें ।।389।।
कां , कुहेसी [10] आकाशा । तोंडी सांदा [11] नाही जैसा , ।
तो परमपुरुषी तैसा । एकवटे गा ! ।।390।।

1 फांदी
2 एकत्र होउन गोठले
3 विरजले
4 टिकली
5 मी पण
6 आनंदभरित होतें
7 सार 8 हीच
आनंदभरित दृष्टी
9 भक्ति
10 विहीर 11 जोड

प्रतिबिंबौनि बिंबवरी । प्रभेची जैसी उजरी [1] ।
तें सोऽहंवृत्ती अवधारी । तैसी होय ।।391।।
ऐसेनि मग परस्परे । तें सोऽहंवृत्ति जै अवतरे , ।
तै , तियेहि सकट सरे । अपैसया ।।392।।
जैसा , सैधवाचा रवा । सिंधूमाजी , पांडवा ! ।
विरालेया , विरवावा , । हेही ठाके [2] ।।393।।
नातरी , जाळूनि तृण । वन्हिहि विझे आपण , ।
तैसे , भेदु नाशूनि जाण । ज्ञानही नुरे ।।394।।
माझे पैलपण [3] जाये , । भक्त हें ऐलपण [4] ठाये [5] ।
अनादि ऐक्य जे आहे , । तेचि निवडे ।।395।।
आतां , गुणाते तो किरीटी ! । जिणे , या नव्हती गोष्टी , ।
जें एकपणाही मिठी , । पडो सरली ।।396।।
किंबहुना , ऐसी दशा , । तें ब्रह्मत्व गा सुदंशा [6] ! ।
हें तो पावे , जो , ऐसा । मातें भजें ।।397।।
पुढती , इही लिंगी [7] । भक्तु जो माझा जगी , ।
हें ब्रह्मता तयालागी । पतिव्रता ।।398।।
जैसे गंगेचेनि वोघे । डळमळीत जळ जें निघे , ।
सिंधुपद तयाजोगे । आन नाही ।।399।।
तैसा , ज्ञानाचिया दिठी । जो मातें सेवी किरीटी ! ।
तो होय ब्रह्मतेच्या मुकुटी । चूडारत्न [8] ।।400।।
यया ब्रह्मत्वासीचि पार्था ! । सायुज्य ऐसी व्यवस्था ।
याचि नांवे चौथा । पुरुषार्थु गा ! ।।401।।
परी माझे आराधन । ब्रह्मत्वी होय सोपान ।
तेंथ मी हन साधन । गमेन [9] हो ।।402।।
तरी झणी [10] ऐसे । तुझ्या चित्ती पैसे [11] ।
पै , ब्रह्म आन नसे । मीवांचूनि ।।403।।

1 सरळ वाट
2 थांबतें
3 पैलकडचा भाव
4 अलिकडचा भाव
5नाहीसे होते
6 मर्मज्ञा
7 लक्षणांनी युक्त
8 मुकुटमणी
9 वाटेल
10 नको 11 वाटेल

ब्रह्मणो हि प्रतिष्ठाऽहममृतस्याव्ययस्य च ।
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च ।।27।।

कारण , मीच अमृत व अव्यय ब्रह्माचे, शाश्वत धर्माचे व एकान्तिक म्हणजें परमावधीच्या अत्यंत सुखाचे अखेरचे स्थान आहे

अगा ब्रह्म या नांवा । अभिप्रायो मी पांडवा ।
मीचि बोलिजे आघवा । शब्दी इही ।।404।।

पै , मंडळ [1] आणि चंद्रमा । दोन्ही नव्हती सुवर्मा ! ।
तैसा , मज आणि ब्रह्मा , । भेदु नाही ।।405।।
अगा नित्य जें निष्कंप । अनावृत धर्मरूप ।
सुख जें उमप [2] । अद्वितीय ।।406।।
विवेकु आपले काम । सारूनि , ठाकीं जे धाम , ।
निष्कर्षाचे निःसीम । किंबहुना मी ।।407।।
ऐसेसे , हो अवधारा ! । तो अनन्याचा सोयरा ।
सांगतसे वीरा । पार्थासी ।।408।।
येथ धृतराष्ट्र म्हणे , । '' संजया ! हे तूंतें कोणे ।
पुसलेनिविण वायाणे [3] । कां बोलसी ? ।।409।।
माझी अवसरी [4] तें फेडी । विजयाची सांगे गुढी '' ।
येरु जीवी म्हणे , '' सांडी । गोठी यिया '' ।।410।।
संजयो विस्मयो मानसी ।' आहा ' करूनि रसरसी [5] ।
म्हणे , '' कैसे पां देवेसी । द्वंद्व यया ? '' ।।411।।
तरी तो कृपाळु तुष्टो । यया विवेकु हा घोटो ।
मोहाचा फिटो । महारोगु ।।412।।
संजयो ऐसे चिंतिता , । संवादु तो सांभाळितां , ।
हरिखाचा येतु चित्ता । महापूर ।।413।।
म्हणौनि , आतां येणे । उत्साहाचेनि अवतरणे ।
श्रीकृष्णाचे बोलणे । सांगिजैल ।।414।।
तया अक्षराआंतील भावो , । पाववीन मी तुमचा ठावो ।
आइका म्हणे ज्ञानदेवो । निवृत्तीचा ।। 415।।

1 चंद्राचे प्रतिबिंब
2 अपार
3 व्यर्थ
4 शंका
5 संतापून

इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयविभागयोगो नाम चतुर्दशोऽ ध्यायः ।।14।।

कठीण ओव्यांचा अर्थ

1. हें श्रीगुरो ! हें आचार्या, तुमचा जयजयकार असो. तुम्ही सकळ देवांत श्रेष्ठ आहात. ब्रह्मात्मैक्य ज्ञानाविषयक बुद्धिरुप प्रातःकाळचा उदय करणारे सूर्य आहात. अखिल विश्वाच्या नित्यसुखासाठीच ज्यांचा खरा उदय करणारे आपण आहात.
2. हें श्रीगुरो ! तुम्ही सर्वांचे विश्रांतिस्थान आहात. सर्वांच्या अंतःकरणात ' ते ब्रह्म मी आहे ' या वृत्तीचा उदय करून, अद्वयानंदाचे सेवन करविणारे आहात. भिन्न भिन्न अशा चौदा भुवनरुपी लाटांचे आपण समुद्रच आहात. तुमचा जयजयकार असो.

3. हें दीनबंधो ! नित्य कारुण्याच्या सागरा आपण स्पष्ट ब्रह्मविद्यारुपी वधूचे पती आहात. हें श्रीगुरो ! ऐका महाराज ! .
4. तूं अज्ञान्यांना अज्ञानाच्या आवरणाने आच्छादित करून लपतोस. त्यांना तूं आपल्या स्वरूपाच्या ठिकाणी हें वस्तुतः नसलेले विश्व दाखवितोस आणि ज्या ज्ञानी लोकांसाठी आपले स्वरूप प्रकट करतोस त्यांना जगत प्रतीती नाहीशी करून सर्व रूपाने तूच तू होतोस.
5. गारुडी आपल्या खेळात दुसऱ्याची दृष्टी प्रतिबद्ध करणारा असा नजरबंदीचा खेळ करीत असतो; पण तो गारुडी आपली स्वतःची दृष्टी चोरीत नाही. आपली नजर त्याला लपविता येत नाही.परंतु हें श्रीगुरो! आपला चातुर्य प्रकार मात्र त्याहून भिन्न व नवलपूर्ण आहे. आपण अज्ञानावरणात लपून जगत दाखविता, आणि आपणच अहंब्रह्मास्मित्याकारक वृत्तीद्वारा अद्वय ब्रह्मरुपाने अभिव्यक्त होता व विश्वाभास नाहीसा करता, असा आपला अद्‌भुत जादूचा खेळ आहे .
6. महाराज, या सर्व जगाला तूच अधिष्ठानरुपाने मुख्य आधार आहेस. तरीही त्यात कोणास तुझे यथावत ज्ञान आहे, तर कोणास तुझ्या यथार्थ स्वरुपाविषयी अज्ञान आहे. असा आपल्याच ठिकाणी एकाच वेळी दोन्ही खेळ, परस्पर विलक्षण स्वरूपाने सुरु आहेत अशा तुला माझा नमस्कार असो.
7. जगतात जें पाणी आहे त्यातील द्रवरुपता व गोडी तुझ्या जिव्हाळ्याने त्यास आली आहे व पृथ्वीला जी सहन करण्याची शक्ती लाभली आहे तीही तुमच्यामुळे लाभली आहे.
8. चंद्र व सूर्य हें मोठ्या शिंपल्याप्रमाणे असून तें या तिन्ही लोकांस जो प्रकाश पाडतात तो तुमच्या तेंजाच्या शक्तीच्या सान्निध्याचाच प्रभाव आहे.
9. महाराज ! चहूकडे फिरणारा जो वायू तो तुमच्याच लोकोत्तर, असीम शक्तीमुळे हालचाल करीत असतो.आणि एवढे मोठे आकाश असले तरी पण तें तुमच्या पोटातच लपंडाव खेळतें . आपण आकाशापेक्षा व्यापक आहात.
10. फार काय सांगावे ! जी माया सर्व विश्वाभासास कारण आहे तीही आपल्याच सत्तास्फुर्तीमुळे एकदेशाचे ठिकाणी आहे. बुद्धिवृत्तीत विषयप्रकाशक जें ज्ञान आहे, तेही आपल्याच स्फूर्तीप्रदानाने आहे. हें वर्णन असो. कारण, आपले वर्णन श्रुतीलाही करण्यात श्रम होतात.
11. वेद तुझे वर्णन करण्यात तोपर्यंतच चातुर्यसंपन्न आहे कीं, जोपर्यंत तुझ्या शुद्ध ब्रह्मस्वरुपाचे त्यास दर्शन झाले नाही. मग तुझें शुद्धस्वरुपाचे दर्शन झाल्यावर आम्हाला व त्यालाही एकाच पंक्तीत बसून मूग खावे लागतात, म्हणजें मौन धारण करावे लागतें.
12. महाराज ! सर्वत्र जलप्रलय होऊन त्यात थेंबादिकांची खिजगणती जशी नाही, तेथ ही मोठी ही लहान नदी म्हणून ओळखता येईल काय ?
13. सूर्य उगवल्यावर जसे चंद्र आणि काजवा समानच असतात त्याप्रमाणे तुझ्या शुद्ध स्वरुपाचे वर्णन करण्याचे बाबतीत माझी व श्रुतीची स्थिती समान अशीच होतें.
14 ज्या ठिकाणी वर्ण्य विषय, वर्णन करणारा असा द्वैताच आधारच पार नष्ट होतो, जेंथे परीसह वैखरी वाणी बुडुन जाऊन स्तब्ध राहतें तेथे शब्दास अविषय असणाऱ्या तुझ्या स्वरुपाचे कोणत्या तोंडाने वर्ण करावे बरे
15 म्हणूनच आता स्तुती करण्याचे सोडून मुकाट्याने व निवांतपणाने तुमच्या चरणावर मस्तक ठेवावे हेच चांगले होय.
31. अशा प्रकारची मधूरता या गुरुकृपेच्या घरच्या भिक्षेने , माझ्या वाणीत बिंबावे हीच इच्छा आहे.
43. आणि आम्ही याला पर म्हणजे सर्वाहून उत्तम म्हणतो, याचे कारण हे की इतर ज्ञाने गवताप्रमाणे असून हे ज्ञान त्यांना जाळून भस्म करणाऱ्या अग्नीप्रमाणे आहे.
93. विषय व इंद्रिये यांचा भूतांशी सबंध असल्यामुळे त्यांचीही या महाभुतांचे बरोबरच स्पष्टता होतें.

135 माझे मला यथार्थ ज्ञान असणे, हें गुणांचा बंध दिसत असून त्या बंधाकडून न बांधले जाण्यास कारणीभूत होते व आपल्या यथार्थ स्वरूपाच्या अज्ञानानेच बंध उत्पन्न होतो.

165 या कार्यात प्राणाला कवडी प्रमाणे लेखून त्याला ओवाळून टाकण्यास तो तयार होतो आणि अशा धडपडीत एक गवताची काडी ही हातास लागली तरी हरकत नाही , तरीही तो आपल्या जन्माचे सार्थक झाले असे मानतो .

176. इरसाल मूर्खपणा म्हणजें दारुच होय. मनुष्य त्यामुळे बोलु नये तें बरळतो व अव्हासव्हा वागतो. अशा या दारुचे भांडे म्हणजे तमोगुणी किंवा मोहनास्त्र घातलेल्या माणसास आपण कोण आहोत याचीच शुद्ध राहत नाही . त्याप्रमाणे तमोगुणी पुरुषाची अवस्था होतें .

206 सर्व इंद्रियांच्या घरी विवेक बुद्धी राबत राहतें आणि हातापायांना अद्‌भुत दृष्टी प्राप्त होतें असे म्हंटले असता ही चालेल.

223. प्रलय काळी स्थूलाचा लय सूक्ष्मात होतो. या पद्धतीने महदादिकांचा विचाराने लय होऊन शेवटी ज्या परब्रह्म स्वरूपाच्या ठायी विचारही मावळतो .

224. असे जें तें परब्रह्म-परमतत्त्व तुम्ही 36 तत्त्वे मानली तर परब्रह्म 37 वे तत्त्व आहें आणि तुम्ही 24 तत्त्वे मानीत असाल तर हें 25 वे आहें. तसेच तीन गुण, तीन अवस्था मानीत असाल तर हे चतुर्थ आहें. एकूण हें सर्वश्रेष्ठ सर्वतोपरी उत्तम आहें.

257. ज्या अग्नीवर दिव्याची ज्योत पाजळली आहें तो मूळचा अग्नी विझला म्हणून काय झाले ? जो पर्यंत याने पाजळलेली दिव्याची ज्योत जळत आहें, तोपर्यंत मूळच्या अग्नीचे सर्व स्वरूप त्या ज्योतीतच आहें.

323. येथे गुणातीताच्या लक्षणा संबंधी व आचारबद्दल अर्जुनाचा प्रश्न आहें. त्यास देव उत्तर देतात. अर्जुना ! गुणातीत हें नांव म्हंटले तर खरे म्हंटले तर खोटे असे उभय एकत्र आहेंत. असे हे तुझे विचारणे आहें तुझी ही प्रश्न करण्याची पद्धत अगदी नवलाचीच वाटतें.

324. कारण ज्याला गुणातीत असे म्हणतात तो गुणाधीन खास नसतोच. अथवा तो जरी गुणात राहटत आहें असा दिसत असला तरी तो गुणाच्या सपाट्यात तादात्म्य भ्रांतीत सापडत नाही हें खास.

325. पण तो गुणातीत या गुणांच्या संबंधात- हालचालीत वावरत असता गुणांच्या आधीन आहें किंवा गुणांच्या आधीन नाही , हें कसे जाणावे !.

360. 'हा ब्रह्मदेव आहें ' असे समजून कुणी स्तुती करो किंवा ' नीच आहें असे समजुन निंदा करो, परंतु राख झाल्यावर जशी तीला जाळण्याची अगर विझण्याची भीती राहत नाही त्याप्रमाणे निंदास्तुतीपासून हर्षविषाद उत्पन्न होत नाहीत.

365. आणखीही एक आचाराची खूण त्या आंगी दिसून येतें, ती ही कीं तो कोणताही व्यापार करीत आहें असे भासत नाही.